# प्रेस नोट ता. १३/०९/२०२३ पोलीस स्टेशन - वाकड

## ८०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने जबरीने चोरण्याचा प्रयत्न, जबरी चोरीचा कट रचणारा सोनार व त्याचे ०४ साथीदारांना अटक

### वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- ०० ---

दि.१२/०९/२०२३ रोजी फिर्यादी नामे मुकेशकुमार जिवाराम लोहार रा. नेहरुनगर, पिंपरी पुणे यांनी पोलीस स्टेशन मध्ये येवुन फिर्याद दिली की ते उमेश जैन यांचे श्री अंबीका ज्वेलर्स, नेहरुनगर पिंपरी पुणे यांचेकडे नोकरीस असुन जैन हे सोन्याचे होलसेल व्यापारी आहे. छोटया दुकानदारांचे मागणी प्रमाणे ऑर्डर घेवुन त्यांना सोन्याचे दागीने पुरविणेचे काम ते करतात. फिर्यादी व त्यांचे सहकारी खुलाराम परीहार यांना पिंपरी चिंचवड परीसरातील छोटया सोनारांकडे जावुन त्यांचेकडुन दागीन्यांची ऑर्डर घेण्याचे काम आहे. दि.०८/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा सुमा फिर्यादी व त्यांचा सहकारी खुलाराम परीहार असे मोटार सायकलवर मार्केटींग करीता सोबत ८०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने घेवुन पिंपरी चिंचवड परीसरात फिरणेकामी रवाना झाले. दुपारी ३.१५ वा सुमा. १६ नंबर थेरगाव पुणे येथील नारायण ज्वेलर्स दुकानात भेट देवुन तेथुन पुन्हा नेहरुनगर पिंपरी कडे जात असताना काळेवाडी फाटयाचे अलिकडे एका काळया रंगाचे स्प्लेण्डर मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसमांनी त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला परंतु तेथे गर्दी असल्याने थांबविता आले नाही. त्यानंतर फिर्यादी हे एम्पायर इस्टेटचा ब्रिज चढत असताना पुन्हा सदरचे मोटार सायकलवरील चोरटयांनी येवुन त्यांना मो.सा. आडवी मारुन त्यांचे ताब्यातील ८०० ग्रॅम वजनाची सोन्याची सॅक जबरीने चोरण्याचा प्रयत्न केला परंतु फिर्यादी व त्यांचे सहकारी गाडीवरुन पडल्याने चोरटयांना सॅक चोरता आली नाही. अशा मजकुरची तक्रार दाखल केली.त्याबाबत वाकड पो.स्टे.गु.रजि.नं.९०१/२०२३ भादविक ३९३,३४१,३४ अन्वये गुन्हा दाखल करणेत आला.

घटनेचे गांभीर्य ओळखुन मा.श्री. गणेश जवादवाड,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण यांना सोबतचे पोलीस अंमलदार यांना पारंपारीक व तांत्रीक तपासाद्वारे चोरटयांचा शोध घेवुन त्यांना अटक करणेबाबत सुचना दिल्या.

तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सिसीटीव्ही फुटेजचे आधारे तपास सुरु केला असता त्यांना सदरचे दोन चोरटयांचे फुटेज मिळाले. ते विश्वासु बातमीदारांना दाखविले असता त्यांनी सदरची मुले चिखली भागातील असल्याचे सांगीतलेने चिखली भागात जावुन तेथुन १) किशोर सुरेश भिसे वय २२ वर्षे रा.बी/२३/४०२, घरकुल चिखली पुणे २) शमशाद रज्जबअली शाह वय २० वर्षे रा. हारगुडे वस्ती, चिखली पुणे यांना गुन्हयात वापरलेल्या स्प्लेण्डर मोटार सायकल नं.एमएच.१४.केएल.९९०६ सह ताब्यात घेतले त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी आणखी दोन साथीदार असलेचे सांगीतले. त्यामुळे चिखलीतुन ३) अभिराज जोखुराम कोरी वय २८ वर्षे रा.हारगुडे वस्ती चिखली पुणे ४) मुस्तफा ऊर्फ गणेश आस्लम शेख वय २३ वर्षे रा. हारगुडेवस्ती, चिखली पुणे यांना स्प्लेण्डर प्लस मोटार सायकल नं.एमएच.१४.जेक्यु.११०९ सह ताब्यात घेतले.आरोपींकडे अधिक तपास केला असता त्यांनी गुन्हयाची कबुली देवुन सांगीतले की, इसम नामे सुनिल बाळकृष्ण वाडेकर वय ४५ वर्षे रा.होळकर चाळीत भाडयाने, पाण्याचे टाकीजवळ आळंदी ता.खेड जि.पुणे हा सोनार असुन त्यांने आम्हाला सदरचे ८०० ग्रॅम सोन्याबाबत संपुर्ण माहीती देवुन ते लुटण्याचा कट रचला आहे असे सांगीतले. त्यामुळे सदरचे सोनारास देखील भोसरी भागातुन अटक केली. तपासादरम्यान सदरचा गुन्हा हा कट रचुन केलेचे तपासात निष्पन्न झाले असल्याने दाखल गुन्हयास **भादविक १२०(ब)** चा अंतर्भाव करणेत आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२ पिंपरी चिंचवड, मा. श्री.डॉ. विशाल हिरे, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.गणेश जवादवाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि.संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, पोहवा.वंदु गिरे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.अतिश जाधव,पोना.अतिक शेख, पोना.प्रशांत गिलबीले, पोशि.भास्कर भारती, पोशि.सौदागर लामतुरे, पोशि.स्वप्निल लोखंडे यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड